
# जय भवानी

१९६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ५०८



REFBK-0017201



सन १९६६
९५-५८७
७५९८२
२२।३।७९ ५०८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय समृद्धी योजना
१९७०

# जय भवानी !

## तुळजापूरची भवानी

दुष्ट सहारिले मार्गें । ऐसें उदंड ऐकिलें ।
परतु रोकडें काहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ।

—समर्थ रामदास

REFBK-0017201

व रामचंद्र देवळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७५९८२ दि. २२।३।७९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९७२०९

किंमत
७५
पैसे



व्होरा ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : ११

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन-माला · ११

चौथी आवृत्ति · १९६७

किंमत ७५ पैसे

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्व-भूमीवर रेखाटलेलीं भाव-रम्य आणि बोलकीं शब्दचित्रे

प्रकाशक
अ ल गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्राय लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी मुंबई २,

मुद्रक
अनंत जे शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांची भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि, त्या त्या स्थानातील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळाचीं सुरेख विश्वसनीय चित्रें, तेथें जाण्याचें रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम याची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें. या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी महिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल

* मोठा, जाड टाइप, सोपी भाषा, आकर्षक मांडणी
* हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा आणि संतदर्शनें भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाशांनाहि मार्गदर्शक शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त·
* डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई राज्य-कडून शालेय ग्रंथालया-साठीं शिफारस
* लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरा-साठी पुरस्कृत
* असिस्टंट क्यूरेटर ऑफ् लाय-ब्ररीज महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयाकरितां विशेष शिफारस केलेली

# जय भवानी!

**महाराष्ट्राची कुलस्वामिनी :**

महाराष्ट्राच्या लोकदैवतांत पंढरपूच्या पांडुरंगाइतकेंच तुळजापूरच्या भवानीचें माहात्म्य आहे. पांडुरंग ही अनुग्रहाची देवता आहे, तर भवानी ही निग्रहाची देवता आहे. महाराष्ट्राच्या भावजीवनाचें भरणपोषण पांडुरंगानें केलें, तर महाराष्ट्राच्या दुष्टविनाशक पराक्रमाची जोपासना भवानीनें केली. पंढरपूरचा पांडुरंग आणि तुळजापूरची भवानी या दोन लोकदैवतांच्या स्वरूपांत सारी मराठी संस्कृति सामावली आहे.

भवानी ही एक शक्तिदेवता आहे. शक्तीची उपासना जगांतल्या अनेक प्राचीन संस्कृतींत प्राधान्य पावलेली होती. भारतीय संस्कृतीप्रमाणेंच इजिप्शियन, सीरियन, रोमन इत्यादि पुरातन संस्कृतींनीं सिंहवाहन शक्तीची उपासना केली होती. अर्थात् या उपासनेचें अखंड सातत्य राहिलें तें या भरतभूमीतच. वेदपूर्वकाळीं इथें भारतांत नांदणाऱ्या सिंधु-संस्कृतींत शक्तिदेवतेचें प्रथम दर्शन होतें. वेदांत ती अदितीच्या रूपानें नांदत आहे. वैदिक ऋषींच्या भावचक्षूंना तिचें जें स्वरूप दिसलें, तें भव्य आणि तेजोमय आहे. 'ती द्युलोकांत वास्तव्य करते; अंतरिक्षांत विहरते. ती जगज्जननी भक्तांचे पाप-ताप संहारते आणि आपल्या अपत्यांना इच्छाफल देते. ती तिन्ही काळांची स्वामिनी आहे.' वैदिक ऋषींनीं तिच्या चरणांशीं समृद्धि, सौभाग्य आणि स्वास्थ्य यांची मागणी केली आहे.

शक्ति ही शिवाची अर्धांगी आहे. या विश्वाची सूत्रचालिका तीच आहे. तिचें अधिष्ठान शिव आहे. तें निर्गुण-निराकार शिवतत्त्व शक्तीच्या आवडीमुळेंच सगुण-साकार बनतें आणि तिच्यासह अर्ध-नारीनटेश्वर बनून क्रीडा करीत राहतें. शिव आणि शक्ति हीं विश्वाचीं माता-पितरें आहेत. या शिव-शक्तीच्या सहजीवनांतूनच विश्वांतलें सारें 'मंगल' निर्माण झालें आहे. मंगलमूर्ति हा शिव-शक्तींचा पुत्र आहे, ही पुराणकल्पनाहि याच तत्त्वाचें प्रतीक आहे.

हिंदु पुराणांनीं शक्तीचा महिमा पुष्कळ गायिला आहे. तिच्या लीलांच्या आणि उपासनेच्या अनेक अद्‌भुत कथा पुराणांत आहेत. शैव आणि वैष्णव संप्रदायांप्रमाणें शक्तीच्या उपासकांचा शाक्त संप्रदाय मध्ययुगांत सर्व भारतभर प्रभावी होता. या शाक्त संप्रदायाचा प्रचार उत्तरकालीन बौद्ध जनांच्या वातावरणांतहि खूप झाला होता. परंतु या संप्रदायाच्या उपासना-पद्धतींत पुढें पुढें अत्यंत अनाचार शिरले आणि विशुद्ध जीवनाला ज्या ज्या गोष्टींचें वावडें आहे, त्या त्या सर्व हीन गोष्टींचा अवलंब हे शाक्तसंप्रदायी करूं लागले. जी 'शिवा'ची पत्नी आहे आणि 'मंगला'ची माता आहे, त्या शक्तीनें हे अत्याचार आणि अनाचार पाहून रौद्र स्वरूप धारण केलें. आपल्या या तथा-कथित भक्तांच्या तावडींतून ती मुक्त झाली. हें शुद्धीकरणाचें कार्य ज्यानें पार पाडलें, त्याचें नांव गुरु गोरखनाथ. शक्तीच्या उपासनेच्या नांवाखालीं चाललेल्या अनाचारांना प्रतिबंध घालण्यासाठीं त्यानें जिवाचें रान केलें आणि शक्तीच्या 'शिव'-स्वरूपाची जाणीव सर्वांना दिली. या वामाचारी उपासनेपासून महाराष्ट्र मात्र प्रायः दूर होता. शक्तीचें 'शिव'-स्वरूप त्यानें कधींहि दृष्टीआड होऊं दिलें नाहीं.

शिखर शिंगणापूरचा महादेव आणि तुळजापूरची भवानी हीं भोसल्यांचीं कुलदैवतें. मालोजीराजांपासून राजारामापर्यंत भोसले घराण्यांतील अनेक पुरुषांनीं भवानीचा 'उदो उदो' केला आहे. मालोजीच्या भवानी-भक्तीची हकीकत चिटणिसाच्या बखरींत नोंदविलेली आहे. शके ११२६ मधील एका ताम्रपटांत तुळजापूरच्या

तुकाईचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा कीं, इ. स. १२०० च्या सुमारास महाराष्ट्रांतील अनेक प्रसिद्ध घराण्यांची कुलदेवता बनलेली ही तुळजा-भवानी त्यापूर्वी अनेक वर्षे तरी प्रसिद्धि पावत असावी. गेलीं आठ शतकें तर तिनें मराठी मनावर अखंड अधिराज्य गाजविलें आहे. शिवछत्रपतींची तिच्या चरणांवर अनन्यसाधारण निष्ठा होती. त्यांच्या स्वराज्य-स्थापनेच्या सर्व प्रयत्नांत याच देवतेची प्रभावी प्रेरणा नांदत होती. त्यांची अशी दृढ श्रद्धा होती कीं, आपल्याकरवीं चालू असलेलें साधूंचें परित्राण आणि दुष्टांचें निर्दाळण हीच भवानी-माता करीत आहे. अशा प्रकारें छत्रपतींनीं भवानीला आपल्या सर्व प्रयत्नांची संजीवनी आणि साक्षिणी मानल्यामुळें ती स्वाभाविकच महाराष्ट्राची कुलस्वामिनी बनली.

क्षेत्र तुळजापूर :

भवानीचें निवासस्थान असलेलें श्रीक्षेत्र तुळजापूर हें मराठ-वाड्यांत उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यांतील तुळजापूर तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. तें सोलापूरपासून केवळ अठ्ठावीस मैलांवर आहे. गांवाचा विस्तार आणि वस्ती बेताचीच असली, तरी विजेचे दिवे, नळाचें पाणी आणि काँक्रीटचे रस्ते यांमुळें गांव सुव्यवस्थित वाटतें. येथें यायला सोलापूर, बार्शी, उस्मानाबाद इत्यादि ठिकाणांहून मोटारींची सोय आहे. देवीच्या लोकप्रियतेला या सर्व सोयींची अनु-कूलता लाभल्यामुळें बाराहि महिने येथें यात्रिकांची रीघ लागलेली असते.

हें गांव समुद्रसपाटीपासून २६३० फूट उंचीवर आहे. बाला-घाट डोंगराच्या एका पठारी कड्यावर तें वसलें आहे. भवानी देवीचें देवालय गांवाच्या पश्चिमेस एका दरींत आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी याहून वेगळें स्थान कसें पसंत करील ? महाराष्ट्र ही गिरिशिखरांची आणि दऱ्याखोऱ्यांची भूमि आहे. त्यामुळें या भूमीच्या कुल-देवतेनें गिरिशिखरांच्या सानिध्यांत आणि दऱ्याखोऱ्यांच्या गाभ्यांत आपलें निवासस्थान निवडलें तर त्यांत नवल नाहीं. देवीच्या मुख्य

मंदिरापर्यंत पोंचण्यासाठीं पायऱ्या आहेत. गांवापासून महाद्वारापर्यंत सुमारें नव्वद पायऱ्या आहेत. या पायऱ्या दोन टप्प्यांनीं उतरून जावें लागतें.

क्षेत्रोपाध्यायांच्या गराड्यांतून सुटका करून आपण मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या उतरूं लागलों कीं, मनांत इतिहासाचीं पानें उलगडूं लागतात. शिवछत्रपतींचे पितामह मालोजीराजे यांनीं जेव्हां भवानीच्या चरणीं आपल्या वंशाची प्रतिष्ठा सोपवली असेल, तेव्हांच येथील गिरिकुहरांत नव्या स्वप्नांचे अंकुर रुजूं लागले असतील. म्लेंच्छांच्या मगरमिठींतून महाराष्ट्राला मुक्त करण्याचीं मनोगतें जाणते-अजाणतेपणीं या मंदिराच्या परिसरांत बोलकीं झालीं असतील. आणि पुढें सतराव्या शतकांत जेव्हां शिवछत्रपतींच्या रूपानें ही शिवशक्ति महाराष्ट्रांत दुष्टसंहारक तांडव करूं लागली असेल, तेव्हां तर हा सारा परिसर उन्मुक्त आनंदाच्या कल्लोळांनीं भिजून गेला असेल. शिवछत्रपतींच्या काळांतील स्थित्यंतराची चाहूल ज्यांना जाणवत होती, त्या नाथांनींहि भवानीचीं स्तुतिस्तोत्रें गायलीं आहेत. नाथांच्या काळांतील तपस्वी ग्रंथकार त्र्यंबकराज (सोळावें शतक) यांनीं भवानीच्या पायाशीं बसून सोळा दिवस अनुष्ठान केलें होतें. नाथांचें 'भावार्थ रामायण' आणि त्र्यंबकराजांचा 'बालबोध' या दोन ग्रंथांचा समर्थ रामदासांच्या वैचारिक घडणींत मोठा वांटा आहे, हें ध्यानांत घेतलें म्हणजे भाविक मनाला असें वाटूं लागतें कीं, ही तुळजापूरची भवानीच जाणिवपूर्वक महाराष्ट्राच्या मुक्तीचें आंदोलन उभें करीत असावी.

इ. स. १६४६ मध्यें शिवप्रभूंनीं या आंदोलनाचा शुभारंभ केला आणि पुढें केवळ एक तपाएवढ्या काळांत त्यांनीं अत्याचारी आक्रमकांच्या हृदयांत धडकी निर्माण केली. शिवप्रभूंच्या प्रभावाचा नायनाट करण्याचें कंकण बांधून इ. स. १६५९ मध्यें विजापूरच्या अफझलखानानें उत्पात मांडावयास प्रारंभ केला. शिवप्रभूंचें प्रेरणास्थान

असलेली येथील भवानीमूर्तीच त्यानें उद्ध्वस्त केली. परंतु भवानी केवळ या पाषाणांच्या गाभाऱ्यांत शिलामूर्ति होऊन राहिली नव्हती. गिरिदुर्गाप्रमाणें ज्यांचीं हृदयें अभेद्य आणि अजिंक्य होतीं, त्या अनेक मराठ्यांच्या हृदयमंदिरांत तिला अढळ स्थान मिळालेलें होतें. त्याचमुळें त्या मूर्तिभंजक म्लेंच्छाला जावळीच्या खोऱ्यांत जिवास मुकावें लागलें आणि भवानीच्या कृपाप्रसादानें शिवप्रभु विजयी झाले. 'सभासद बखरीं'त अफझलखानाच्या उत्पाताचें आणि भवानीच्या कोपाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :

"तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन चौरसचौरस लष्कर उतरलें आणि पुढें तुळजापुरास आले तेथें येऊन मुक्काम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून जातियात घालून भरडून पीठ केले. भवानीस फोडताच आकाशवाणी जहाली की, अरे अफझलखाना, नीचा, आजपासून एकविसावे दिवशी तुझें शिर कापून, तुझें लष्कर अवघें सहार करून, नवकोटी चामुंडांस सतृप्त करतें "

या विजयानंतर भवानीची पुनःप्रतिष्ठापना झाली आणि शिवप्रभूंच्या सोयीसाठीं तिनें आपलें आणखी एक निवसस्थान म्हणून प्रतापगडाची निवड केली.



प्रतापगडावरील श्रीभवानीची मूर्ति

समर्थांची तर भवानीच्या चरणांवर असीम निष्ठा होती. त्यांच्या घराण्याची ती कुलदेवताच होती. त्यांच्या वडिलांनीं समर्थांसाठीं म्हणून तुळजापूरच्या भवानीला कांहीं नवस केला होता. त्या नवसाची फेड करावयाचें तसेंच राहून गेलें होतें. नंतर त्या नवसाची फेड समर्थांनीं प्रतापगडीं जाऊन केली :

देखिली तुळजा माता । निवालों अंतरी सुखें ।।
तुटली सर्वहि चिंता । थोर आधार वाटला ।।
आघात संकटें वारी । निवारी दुष्ट दुर्जनां ।।
सकटी भर्वसा मोठा । तत्काळ काम होतसे ।।
प्रपंची आमुचे कुळीं । तुळजा कुळदेवता ।।
नेणतां ऐकिलें होतें । जाणतां स्मरलें मनीं ।।
श्रेष्ठांचो कामना होती । पुरविली मनकामना ।।
नौस जो नौसिला होता । तो त्यापासूनि चूकला ।।
तुझिया दर्शना आलों । कृपादृष्टीं नवाजिलों ।।
तुझा नवाजिला आहें । महंत म्हणती जनीं ।।

असा भवानी-दर्शनाचा आनंद व्यक्त केल्यावर समर्थांनीं देवीजवळ आपल्या हृदयांतील एकमेव इच्छा व्यक्त केली आहे :

येकचि मागणें आता । द्यावें तें मजकारणें ।
तुझा तू वाढवी राजा । सीघ्र आम्हाचि देखता ।।
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ।।

महाराष्ट्राच्या राजाचा देवीनें प्रतिपाळ करावा आणि त्याचें चढतें-वाढतें वैभव आपल्याला 'याचि देहीं याचि डोळां' पहायला मिळावें, हें समर्थांचें खरें ईप्सित होतें. भवानीनें त्यांची मनःकामना पूर्ण केली. महाराष्ट्रांतील मनें आणि मनगटें 'रोकड्या सामर्थ्या'नें समृद्ध करून देवीनें दुष्ट-संहाराचें कार्य तडीस नेलें. भवानीच्या कृपेनें आणि साक्षीनें घडलेल्या या रोमहर्षक इतिहासाची नोंद शिव-काळांतील बखरींतून जागोजाग आढळते.

भवानीच्या कृपासामर्थ्याचा एवढा रोकडा प्रत्यय आल्यामुळें स्वाभाविकच मराठमंडळांतील साऱ्या धीर पुरुषांची तिच्या ठायीं श्रद्धा जडली. छत्रपति शाहूमहाराज, रामराजा, पेशवे घराण्यांतील राधाबाई, काशीबाई, आनंदीबाई इत्यादि स्त्रिया, मुधोजी निंबाळकर,

दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, अहल्याबाई होळकर इत्यादींनीं या स्थळाला भेट दिल्याचे उल्लेख कागदोपत्रीं आढळतात. देवीच्या पूजेच्या व्यवस्थेसाठीं मराठे राज्यकर्त्यांनीं मोकासे करून दिले होते.

बरीदशाही, आदिलशाही, मुघलशाही आणि अलीकडची निजामशाही या क्रमानें मुस्लिम सत्तेचा सतत संपर्क या स्थळाला सहन करावा लागला. निजामशाहानें महादजी नाईक निंबाळकर यांचे पुत्र रंभाजी यांना संस्थानांतून जी जहागीर दिली, तींत हें क्षेत्र समाविष्ट होतें. या घराण्यांतील जानोजी व रावरंभा यांच्या अमलांत या क्षेत्राची सर्व प्रकारें सुधारणा झाली. यांच्या अमलांतच आजच्या इमारतींपैकीं बराच भाग बांधला गेला आहे. इ. स. १९४८ मध्यें भवानीनें जणूं पुनः एकदां 'रोकडे सामर्थ्य' दाखविलें आणि महाराष्ट्राची ही कुलस्वामिनी सर्वार्थांनीं मराठी वातावरणांत नांदूं लागली.

मंदिराच्या वाटेवर :

हा आठवणींचा संभार चाळवतां चाळवतां आपण पायऱ्यांच्या पहिल्या टप्प्यावर येतों. या टप्प्यावर आपल्या डाव्या हाताला कल्लोळतीर्थ आणि उजव्या हाताला गोमुखतीर्थ लागतें. गोमुखतीर्थाच्या ठिकाणीं पांच-सहा फूट उंचीवरून गोमुखांतून सतत जलधारा सांडत असते. भर उन्हाळ्यांतहि या धारेला खंड नसतो. या तीर्थाचा उगम वरच्या बाजूच्या महंकावतीच्या तळ्यांत आहे. तें तळें जर आटलें तरच ही धारा खुंटते.




गोमुखतीर्थ

येथील क्षेत्रस्थांची मात्र अशी श्रद्धा आहे कीं, हा साक्षात् गंगेचा प्रवाह आहे. आपल्याला त्याविषयीं जर शंका आली तर ते लगेच शंका-निरसनार्थ एक पुरावा आपल्यापुढें सादर करतात !

कुणी एक गरीबनाथ नांवाचा नाथपंथी साधु येथें देवीच्या सान्निध्यांत राहात होता. तो एकदां गंगास्नानाठीं उत्तरेंत निघाला. देवीनें त्याला रोखलें आणि सांगितलें, "वेड्या, उगाच पाय कां शिण-वतोस ? ही गोमुखांतून सांडणारी धारा म्हणजे गंगाच आहे." त्यानें देवीचें ऐकलें नाहीं. जातांना देवीनें त्याच्याबरोबर एक काठी आणि एक लिंबू दिलें अन् त्या दोन वस्तु स्नानाच्या वेळीं गंगार्पण करावयास सांगितल्या. नवल असें कीं, गरीबनाथ जेव्हां परत तुळजापुरास आला, तेव्हां त्यानें गंगार्पण केलेल्या त्या वस्तु इथें गोमुखतीर्थातून येतांना त्याला आढळल्या.

गोमुखांतून पडणारी जलधारा अंगावर घेण्यासाठी यात्रिकांची नेहमीच दाटी असते.



कल्लोळतीर्थ

गोमुखतीर्थापूर्वी लागणारें कल्लोळतीर्थ तर म्हणे प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें आपल्या चारी हातांनीं खोदलें. ब्रह्मदेवानें पाचारण केल्यावर धरतीवरील सकळतीर्थांनीं एकदम इथें कल्लोळ केला, म्हणून यानें नांव कल्लोळतीर्थ !

या कल्लोळतीर्थाचा आकार ४०×१६ फूट असून त्याची बांधणी एखाद्या मोठ्या भक्कम हौदासारखी आहे.


गोमुखतीर्थाजवळच गणेश-तीर्थ, अमृतकुंड वगैरे तीर्थें आणि

सिद्धिविनायक, विठ्ठल, दत्तात्रेय इत्यादि देवतांचीं छोटीं मंदिरें आहेत. तीर्थस्नान करून आणि या देवतांचें दर्शन घेऊन आणखी ब-याच पाय-या उतरून गेल्यावर भवानीच्या मुख्य मंदिराचा प्राकार दिसूं लागतो.

**भवानीच्या मंदिरांत :**


मंदिराभोंवताली विस्तृत प्रांगण, प्रशस्त ओव-या आणि मजबूत तट आहे. मंदिराच्या त्या विस्तीर्ण प्राकारांत दर्शनी बाजूस एक मोठें होमकुंड आहे. नवरात्रोत्सवांत अष्टमी आणि नवमी या दोन दिवशीं येथें होमहवन होतें. होमकुंडाजवळ दर्शनी बाजूला देवीच्या पादुका आहेत. होमकुंडासमोर असलेल्या दोन दीपमाळा शिवप्रभूंनीं बांधल्या आहेत, असें सांगतात.

होमकुंडाच्या मागें श्रीभवानीचें भव्य मंदिर उभें आहे. मंदिराचें शिल्प आणि त्यावरील सुवर्णकळस पाहणारांचें लक्ष वेधून घेतो. मंदिराचें शिल्प अत्यंत प्राचीन असून तें हेमाडपंती पद्धतीचें आहे. मुख्य सभामंडप आणि मंदिराचा गाभारा हेमाडपंती स्वरूपाचा असून या गाभा-याभोंवतीं दगडी आधार देऊन आजचें सुंदर मंदिर सुमारें दोनशें वर्षांपूर्वी बांधलें आहे. मंदिरावर हत्ती, घोडे, मोर, माकडें, यक्ष, किन्नर, गंधर्व, देवदेवता वगैरे अनेक मूर्ति आहेत. वेलबुट्टी जाळ्या आणि नक्षीकाम मनोवेधक व प्रेक्षणीय आहे. मंदिराचें सुवर्णशिखर बीड येथील श्री. ठिगळे यांनीं सुमारें शंभर वर्षांपूर्वी चढविलें.



श्रीभवानी मंदिराचें महाद्वार

भवानीच्या गाभा-यासमोरच श्रीभवानी-शंकराचें देऊळ




आहे. त्यांतील महादेवाच्या पिंडीवर महादेवाचा पंच धातूंचा मुखवटा घालतात. मंदिराच्या मध्यभागीं देवीच्या सन्मुख स्फटिकाचा सिंह आहे. सिंह हेंच देवीचें वाहन. देवीपुढील सभामंडपांत लग्न, मौंजी, जावळ काढणें इत्यादि कार्यें होतात आणि गोंधळ, जागरण इत्यादि कार्यक्रम होतात.

देवळाच्या आंतील फरशीवर, खांबावर, देवळाच्या फरसबंदीवर, पायऱ्यांवर रुपये ठोकून बसविल्याच्या खुणा आहेत. आतां

हे सारे रुपये काढून गाभाऱ्याची दर्शनी बाजू, गाभाऱ्याचे दरवाजे, चबुतरा इत्यादि सर्वच भाग चांदीच्या जाड पत्र्यानें मढविला आहे. या चांदीच्या पत्र्यावर जय-विजय कोरले आहेत. अनेक प्रकारची वेलबुट्टी व नक्षी काढली आहे. गाभाऱ्याच्या दारावर गजगौरीची मनोहर मूर्ति आहे.

गाभाऱ्यांत डोकावतांच सिंहासनावर विराजमान झालेली भवानी दिसते. ही मूर्ति काळ्या गंडकी शिळेची आहे. तिचें शिल्प अति सुंदर आणि रेखीव आहे. ही मूर्ति अष्टभुजा असून तिनें आपल्या सहा हातांत विविध शस्त्रें धारण केलीं आहेत. आपल्या डाव्या हातानें तिनें महिषासुराची शेंडी पकडली असून उजव्या हातानें त्याच्या छातींत त्रिशूळ खुपसला आहे. देवीच्या पायाखालीं रेड्याचें धड आहे. खालच्या बाजूस त्याचें शिर पडलेलें आहे. भवानीच्या उजव्या बाजूला सिंह असून त्याच्या बाजूला पुराण सांगणारी मार्कंडेय ऋषींची मूर्ति आहे. देवीच्या उजव्या स्कंधावर चंद्र असून डाव्या स्कंधावर सूर्य आहे. देवीच्या उजव्या बाजूला स्वतःला उलटें टांगून घेऊन देवीची तपश्चर्या करणाऱ्या अनुभूतीची—एका साध्वीची छोटी प्रतिमा कोरलेली आहे. देवीच्या मस्तकावरील मुकुटांत मध्यभागीं शिवलिंग आहे. अशी ही भवानीची मूर्ति अतिसुंदर आणि रेखीव असून पाहणाराचें मन ती सत्वर वेधून घेते.



श्रीभवानीची (स्वयंभू) मूर्ति

आई भवानीचें हें उग्र-भीषण ध्यान डोळ्यांत सांठवितांना आपलें दुबळें मन कंप पावूं लागतें. ज्या उग्र-भीषण रूपाची पूजा बांधा-

यला शिवप्रभु आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीं तळहातीं शिर घेतलें आणि जिच्या दुष्टसंहारकार्याची ध्वजा रंगविण्यासाठीं शेंकडों मराठ्यांनीं आपल्या रक्ताचा रंग उधळला, तिची पूजा आपण पामरांनीं कशी बांधावी ? तिच्या चरणांवर आजवर अनेक वज्रपुरुषांनीं माथा घासून बलिदानाची दीक्षा स्वीकारली होती—आणि आपण कातडी बचावण्यासाठीं लाचारी पत्करणारे जीव ! अशी दुबळेपणाची जाणीव झाली कीं मन देवीला विनवूं लागतें, "आई, आम्हांला मनोबल दे. सत्याची आणि न्यायाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं सर्वस्वार्पणाची निर्भयवृत्ति आमच्या हृदयांत संचारूं दे. विकारांच्या दैत्यांना पदतळीं तुडविणारी प्रखर सत्यनिष्ठा बनून तूं आमच्या हृदयासनावर अधिष्ठित हो. महाराष्ट्रभूमि तुझ्या कृपेच्या बळावरच स्वातंत्र्याची उपासना करीत आली आहे—आजहि आम्हांला तुझ्या कृपासंजीवनीची नितान्त गरज आहे."

'आईचा उदो उदो !' :

भुत्ये आणि गोंधळी हे देवीच्या दरबारांतले परंपरागत भाट. एकनाथांच्या पूर्वीपासून त्यांची परंपरा चालू आहे. त्यांनीं साऱ्या महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत दिवट्या पाजळून आईचा 'उदो उदो' घुमविला आहे. एके काळीं त्यांच्याकरवीं आई भवानी मराठी मनांना एका सूत्रांत बांधीत होती, एका पवित्र कार्यासाठीं सज्ज करीत होती आणि महाराष्ट्राच्या जीवनांत मांगल्याची पेरणी करीत होती. आज त्यांचें स्वरूप केवळ परंपरेच्या अंधानुकरणाचें आणि उदरंभरणाचें बनलें असलें, तरी मराठी संस्कृतीचे संरक्षक आणि संवर्धक म्हणून त्यांचें ऐतिहासिक मूल्य आपणांस मान्य करावें लागेल.


अंगात मलमलीचा अंगरखा, त्यावर जाकीट आणि डोक्यावर पेंचाचें बसकें पागोटें बांधलेला कल्लेदार मिशांचा गोंधळी संबळ झडवूं लागला कीं, आजहि आपले कान त्याचे शब्द ऐकण्यासाठीं तत्पर बनतात. गव्हाच्या पुंजीवर घट मांडून आणि वर जोंधळ्याच्या ताटांची तिवई उभी करून तो आई भवानीला आवाहन करूं

लागला कीं, त्याच्या साथीला तुणतुण्याची तार 'तुईंतुईं' करूं लागते आणि संबळ कडकडूं लागतो. संबळ-तुणतुण्याच्या साथीवर पाजळलेल्या पोताच्या लालसर प्रकाशांत तो मग सारी रात्र रोमांच-कारी कथांनीं आणि मराठमोळ्या गीतांनीं जागवतो. पिढ्यान् पिढ्या त्याच्या मुखीं नांदणाऱ्या त्या अद्भुतरम्य कथा ऐकतांना आजहि आपण रंगून जातों आणि या भवानीच्या भाटाला मनोमन मानाचा मुजरा करतों.

आपला संदेश बहुजनसमाजापर्यंत पोंचविण्यासाठीं नाथांनीं या लोकधर्माच्या प्रचारकांचा चांगलाच उपयोग करून घेतला. नाथहि क्षणभर गोंधळी बनले आणि त्यांनीं आईला हांक दिली :
'गोंधळा ये वो जगदंबे !'

या नाथांच्या गोंधळासाठीं स्वर्ग-मृत्यु-पाताळांची तिवई उभारली गेली आहे. तिवईवरच्या टोकाला ज्ञान-वैराग्याचा फुलवरा बांधलेला आहे. चंद्र-सूर्यांचा पोत पाजळलेला आहे आणि व्यास-वसिष्ठ-शुकां-सारखे मातब्बर गोंधळी 'उदो उदो'चा उद्घोष करीत नाचत आहेत. गोंधळ्या-प्रमाणेंच नाथांनीं भुत्याचीहि भूमिका पत्करली आहे—

भवानी, मी तुझा भुत्या खरा ।
अनुहात चवडक वाजत डुगडुग
होतो घोष बरा ।
बोधाची परडी ज्ञानाचा संबळ ।
अज्ञान तो पोत खरा ।
एका जनार्दनी भुत्या मी झालों
तुझे पायीं मी खरा ।



हल्लींहि नवरात्रांत रात्री-च्या वेळीं हातांत जळता पोत घेऊन तेलकट वेशाचा आणि कवड्यांचे अलंकार ल्यालेला

भुत्या आपल्या दारीं आला कीं, त्याच्या मुखींच्या रांगड्या स्तोत्रांनीं आपण क्षणभर वर्तमानकाळ विसरून जातों. शिवकालांत तर या भुत्या-गोंधळ्यांनीं स्वातंत्र्य-भवानीचा जयजयकार घराघरांतून घुमविला होता.

सती अनुभूतीच्या प्रतिष्ठेसाठीं :

तुळजाभवानीचें वर्णन अग्निपुराण, स्कंदपुराण आणि देवी-भागवत या ग्रंथांतून आलें आहे. पुराणांत भवानीविषयक अनेक कथा आहेत. देवी भवानीचें पौराणिक नांव 'तुरजा.' प्राकृतांत ती 'तुळजा' बनली. तुळजापूर क्षेत्र कसें निर्माण झालें, याबद्दलची पुढील पुराण-कथा विशेष रूढ आहे :

हजारों वर्षें झालीं त्या गोष्टीला. दंडकारण्यांत दिंडीर वनाच्या सीमेवर हा भाग होता. येथील अरण्यांत आर्यांनीं आश्रम बांधले होते. सह्यागिरीच्या दूरवर पसरलेल्या फांट्यावर निसर्गानें सौंदर्याची बारेमाप उधळण केलेली होती. शांत-शीतल वातावरणांत पर्वतांच्या गुहांमधून वृक्ष-झऱ्यांच्या सहवासांत शेंकडों ऋषि-मुनि तपश्चर्या करीत. त्यांच्या यज्ञधूमाचा गिरिशिखरांवरील धुक्यांशीं संगम होऊन वातावरण धूसर बनत असे. प्रखर रविकिरणें चंद्रिकेचें शांतरूप धारण करीत असत. डोंगर-उतरणीवर गाईगुरांचीं खिल्लारें पुष्ट होऊन स्वच्छंद बागडत असत. सतत स्रवणाऱ्या झऱ्यांचे स्रोत दुग्धधारांप्रमाणें फेसाळत कड्यावरून उड्या घेत असत. त्यांच्या घनगंभीर आवाजाची साथ ऋषि-मुखांतील वेदमंत्रांच्या घोषांत मिसळून एकप्रकारची विलक्षण प्रसन्नता या दरींत घुमत असे.

अशा या तपोभूमींत कृतयुगाच्या काळांत कर्दम नांवाचा ब्रह्म-वेत्ता ऋषि आपल्या पत्नीसह सुखानें राहत होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी अनुभूति सती जाऊं लागली; तेव्हां लोकांनीं तिला परावृत्त केलें. कारण ती गर्भवती होती. पतिनिधनानंतर सती अनुभूति यथाकाल प्रसूत झाली. पुत्रपालनाचें कर्तव्य तिनें चोख रीतीनें बजावलें. पुत्राला गुरुगृहीं सोंपवून ती तपश्चर्येसाठीं मेरुपर्वतावर निघून

गेली. अष्टांगयोगाची खडतर तपश्चर्या तिनें केली. तिनें स्वतःला उलटें टांगून घेऊन अग्निसाधनहि केलें. त्या तपाच्या तेजानें ती साध्वी अधिकच तेजस्वी बनली. ती सौंदर्यानें अनुपम व अतुलनीय गणली जाऊं लागली. तिच्या कांतीची शोभा चंद्रकिरणांप्रमाणें दशदिशांत पसरत होती.

एके दिवशीं कुकुर नांवाचा दैत्यराज शिकारीसाठीं सैन्यासह तेथें आला. त्याच्या राक्षसी स्वभावानुसार तो अनुभूतीवर मोहित झाला आणि अकस्मात् त्यानें तिच्या शरिराला स्पर्श केला. अनुभूतीची समाधि भंग पावली. तिनें दैत्याकडे रागानें पाहिलें.

त्या दुष्टाला शाप द्यावा तर तपाचें पुण्य नाश पावेल, गप्प बसावें तर पातिव्रत्याचा भंग होईल, या पेचानें ती गोंधळली. तिनें डोळे मिटून आपल्या उपास्यदेवतेचा धांवा केला. तेव्हां आदिशक्ति पार्वती भवानीच्या रूपानें तेथें आली. देवीनें अनुभूतीचें दुःख जाणलें आणि अष्टभुजा तुरजादेवीचें रूप धारण करून कुकुर राक्षसाशीं युद्ध केलें. युद्धांत देवीचा आपणाला पराजय करतां येत नाहीं, असें पाहून तो दैत्य निरनिराळीं मायावी रूपें धारण करूं लागला. त्या दैत्या-ऐवजी देवीला पांच फडा असलेला भयंकर नाग दिसूं लागला. देवीनें आपल्या चार हातांनीं त्याच्या चार फडा दाबून धरल्या. पांचवी फडा ती तलवारीनें तोडून टाकणार इतक्यांत तो नाग नाहींसा झाला आणि आकाशांत लाल डोळे असलेले आणि करवतीसारखी नखें असलेलें एक भयंकर गिधाड दिसूं लागलें. देवीनें तें गिधाड खालीं आल्याबरोबर त्याचा एक पंजा तलवारीनें तोडून टाकला. इतक्यांत गिधाड अदृश्य झालें. त्या ठिकाणीं एक अजस्र रेडा दिसूं लागला. त्याचा एक पाय थोडासा अधु झाला होता. त्यांतून रक्त वाहात होतें. त्याचा रंग अमावास्येप्रमाणें काळा कुळकुळीत दिसत होता. त्याचीं शिंगें वधशूळाप्रमाणें टोंकदार होतीं. त्याचे डोळे अग्नीच्या स्फुल्लिंगाप्रमाणें धुमसत होते. खुरांनीं जमीन उकरीत नाकानें भयकारी


श्वासोच्छ्वास करीत तो मस्त महिष सिंहवाहिनी देवीच्या अंगावर चालून आला. देवीनें एक हुंकार देऊन आपल्या आठव्या हातांतील तलवार उचलली, त्याची मान धडापासून खालीं उतरली आणि त्याच्या रक्ताचा मळवट आपल्या भालीं लावला. अशाप्रकारें सिंहवाहिनी देवीनें त्या दैत्याचा–महिषासुराचा वध केला. तरीहि त्याचे अंशरूप राक्षस शुंभ-निशुंभ देवीवर धांवून आले. त्या शुंभ-निशुंभांस देवीनें आपल्या शस्त्रांनीं ठार केलें. अनुभूतीचें संकट टळलें. दुष्टांचा नाश झाला. चामुंडादि योगिनींनी दैत्य-सैन्याचा फडशा उडविला. तो अभूतपूर्व प्रसंग पाहून सर्वत्र आनंदीआनंद झाला.

सती अनुभूतीनें जगन्मातेची प्रार्थना केली कीं, "हे त्वरिता देवी, माझें संकट जसें तूं त्वरित दूर केलेंस, तशींच अनेक भक्तांचीं संकटें निवारण्यासाठीं तूं याच रूपानें मृत्युलोकावर येऊन राहा."

देवीनें सतीची प्रार्थना मान्य केली आणि यमुनाचळावर भवानी रूपानें राहाण्याचें ठरविलें. तिनें या गिरिदरींत भैरवगणांसह ठाण मांडलें. तेव्हांपासून या महाराष्ट्रभूमींतील सती-साध्वींच्या शीलावर आक्रमण करणाऱ्या नरराक्षसांना शासन करण्याची जबाबदारी भवानीनें स्वतःवर घेतली. महाराष्ट्राचा इतिहास या कार्याचें प्रत्यंतर देत आहे.

देवीचा परिवार आणि परिसर :

देवीच्या मंदिराच्या प्रदक्षिणा-मार्गावर यमाई, नरसिंह, लक्ष्मी-नारायण, खंडोबा इत्यादि देवतांचीं छोटीं-मोठीं मंदिरें आणि ओवऱ्या आहेत. या मंदिरांचें बांधकाम गेल्या दीड-दोनशें वर्षांतील असावें. मंदिराच्या डाव्या बाजूच्या ओवऱ्यांत कोल्हापूरच्या महाराजांनीं दिलेला देवीचा हस्तिदंती पलंग आहे. त्याच्या शेजारच्या ओवरींत देवीचीं छबिन्याचीं लाकडी वाहनें–सिंह, हंस, मयूर, नंदी वगैरे–ठेवलेलीं आहेत. प्रदक्षिणेच्या वाटेवर शकुनवंती पुढें दिसते. या शकुनवंतीपुढें मनो-



भवानीच्या मंदिराचा परिसर

वांछिताच्या सिद्धीचा निर्णय लावून घेण्यासाठीं यात्रिकांची गर्दी असते. मनांत विशिष्ट हेतु ठेवून देवीचें स्मरण करून कौल लावतात आणि उजवी-डावी पाहून यशापयशाचें भविष्य जाणून घेतात. पुरुषार्थाची कास धरून जीवनाची घडण करणारे शिवप्रभूंसारखे भवानीचे भक्त कुठें आणि केवळ शकुनवंतीच्या शकुनांवर भरवसा ठेवून दैवावर हवाला टाकणारे हे क्रियाशून्य दैववादी कुठे !

भवानीच्या मंदिराच्या परिसरांतील ईशान्य कोपऱ्यांत मातंगी देवीचें देवालय आहे. मातंगासुराचा वध करण्यासाठीं भवानी देवीनें मातंगी देवीचा अवतार घेतला, असें म्हणतात. या देवीचे पुजारी महार जमातींतील आहेत. मातंगीच्या पश्चिमेस मातंगकुंड आहे. मातंगकुंडांत स्नान करून महार पुजारी असणाऱ्या मातंगीदेवीचें पूजन ब्राह्मण, मराठे वगैरे सर्व जातींचे यात्रेकरू करतात, ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे.

मुख्य मंदिराच्या पश्चिम दरवाजांतून खालीं खोल दरींत पाहिलें तर खरोखरच अति मनोहर दृश्य दिसतें. दोहों बाजूंना उंचच उंच डोंगर, त्यामध्यें खूपच खूप दाट झाडी, झाडामधून डोकावणारीं मंदिरें, शिखरें, निशाणें, हें सर्व दृश्य मनाला मोहून टाकतें.

दाराच्या जवळच डाव्या बाजूला महंत दमरोजीबुवा आणि महंत वाकोजीबुवा यांचे मठ आहेत. या मठाधिपतींकडे देवीच्या पूजेचें साहित्य देणें-घेणें, दागदागिन्यांवर देखरेख ठेवणें, निरनिराळ्या प्रकारची व्यवस्था करणें अशीं कामें आहेत. या मठांमध्यें देवीच्या छोट्या पण सुंदर अशा मूर्ति आहेत.

पायऱ्या उतरून खालीं जातांच आराधवाडी नांवाची लहानशी वाडी लागते. वाडींतील सारे लोक मराठा जातीचे आहेत. ते सर्व देवीची उपासना करणारे भुत्ये आहेत.

आराधवाडीच्या दक्षिणेस गर्द झाडींत जो भक्कम, दगडी बांधणीचा मठ आहे त्याला भारतीबुवांचा मठ म्हणतात. अंबाभवानी तुळजादेवी नेहमीं याच मठांत राहते. फक्त पूजेच्या वेळीं हांका मारल्यावर सकाळ-सायंकाळ ती मुख्य मंदिरांत वर जाते आणि पूजा आटोपतांच परत या मठांत येऊन राहते अशी एक समजूत आहे.

या मठाचे महंत रणछोड भारती यांना शंकराचा अवतार मानतात. रणछोड भारतीबरोबर देवी पार्वती सारीपाट खेळत असे,

अशी कथा आहे. या बुवांनी जिवंत समाधि घेतली. त्यांची समाधि व देवीची सुंदर मूर्ति प्रेक्षणीय आहे. येथील पूजा झाल्यानंतरच डोंगरावरील मुख्य देवळांत देवीची पूजा होते.

तुळजापूरच्या दक्षिण टेकडीवर असलेल्या सुंदर मंदिरांत एक प्रचंड शिळा आहे. तिला 'घाटशिळा' म्हणतात. सीतेचें रूप घेऊन आलेली पार्वतीदेवी त्या शिळेवर बसून श्रीरामाशीं बोलली. तेथूनच तिनें रामाला दक्षिणेचा–लंकेचा–मार्ग दाखविला आणि वर दिला कीं, "रामा, चिंता करूं नकोस. सीतेचा शोध लागेल. तूं दैत्यांचा पराभव करशील आणि विजयी होऊन अयोध्येला परत जाऊन राज्यपद पावशील."




घाटशिळा

रामाला असा वर दिल्यामुळे येथील देवीला 'रामवरदायिनी' हें नांव प्राप्त झालें.


घाटशिळेच्या मंदिराजवळ पापनाशी नांवाचें तीर्थ आहे. त्या पुष्करिणींत इंद्रानें स्नान केलें, त्याबरोबर वृत्रासुराच्या वधाचें त्याचें पातक नाहींसें झालें. येथें इंद्रवरदायिनीचीहि मूर्ति आहे. पुष्करिणीची आणि देवळाची बांधणी मजबूत आणि दगडी आहे.

रामदरींत रामवरदायिनी देवीचें अत्यंत सुंदर मंदिर आहे. ही देवी अष्टभुजा असून अत्यंत रेखीव आहे. तेथून थोडें अंतर पूर्वेकडे चालून जातांच गरीबनाथबुवांचा मठ लागतो. या मठांत हिंगळाज देवीची मूर्ति, दशावतारांच्या मूर्ति, तुळजाभवानीची मूर्ति,



पापनाशी तीर्थ

महंत आणि त्यांचे शिष्य यांचे पुतळे आहेत. ते प्रेक्षणीय आहेत. हा मठ नाथपंथाच्या परंपरेंतील आहे.



मकावती तीर्थ

गायमुखाच्या पूर्वेला गांवांतच एक प्रचंड स्नानकुंड आहे. त्याचें नांव मंकावती तीर्थ. चौफेर मजबूत भव्य दगडी बांधणी असलेली पायऱ्या-पायऱ्यांची ती एक मोठी बारव आहे. तीन बाजूंनीं तिला प्रवेशद्वारें आहेत. पुष्करिणीतील पाणी शेवाळानें हिरवेंगार बनलें आहे. तीर्थकुंडाची बांधणी आणि भोंवतालच्या ओवऱ्यांची बांधणी मजबूत आहे. या तीर्थांत योगिनीसह देवी भवानी दर प्रदोषकाळीं जलविहारासाठीं येते,

अशी समजूत आहे. मंकावतीशिवाय अमृतकुंड, सूर्यकुंड, चंद्र-कुंड, चक्रतीर्थ इत्यादि लहान-मोठीं, प्रसिद्ध-अप्रसिद्ध तीर्थें तुळजापूरला आहेत.

गांवाच्या वेशीबाहेर मजबूत बांधणीची एक प्रचंड पण सुंदर बारव आहे. तिला अहल्याबाईची विहीर म्हणतात. अहल्याबाईनें विहीर बांधल्याची नोंद करणारा पुढील शिलालेख विहिरीवर आहे.

श्रीदेविपदि तोषणार्थमतुल विख्यात कीर्तिक्षितो ।
मल्हारातिवधूश्च कर्तुमधुना रेवातटे सस्थिता ॥
खडेरायवधूश्चकार जगतः क्षेमाय वापी परी ।
सारामानमरेंद्र वद्यसलिले नाम्ना अहल्यासती ॥ १ ॥
शके सत्राशें सात नृपशालिवाहन शके ॥

या विहिरीशिवाय अहल्याबाईनीं बांधलेल्या आणखी कांहीं इमारती तुळजापुरास आहेत.

गांवाच्या पूर्वेस धाकटें तुळजापूर आहे. तेथें तेली, कोष्टी, साळी, माळी, कुंभार वगैरे ग्रामोद्योगी मजुरांची वस्ती आहे. खुद्द तुळजापूर क्षेत्रांत तेलघाणा चालत नाहीं, कुंभाराचें चाक फिरत नाहीं, कापडाचा माग चालत नाहीं, लोक पलंगावर झोंपत नाहींत. असें असल्यामुळें वरील सारे उद्योगधंदे या धाकट्या तुळजापुरास चालतात. लोकांचें लक्ष देवीकडेच फक्त केंद्रित व्हावें, या उद्देशानें क्षेत्रांत वरील निर्बंध घातले असावेत, असें वाटतें.

कांहीं वर्षांपूर्वी धाकट्या तुळजापुरास शेत नांगरीत असतांना देवीची एक उत्कृष्ट मूर्ति सांपडली. तिचें शिल्प अत्यंत रेखीव आहे. ती हुबेहूब तुळजाभवानीच्या मूर्तीप्रमाणें आहे. मूर्तीच्या चरणांजवळ "चंद्रात्र गोत्री हरी गोविंद महाजन अदिस्ता १८" असा लेखहि कोरलेला आहे.

घाटशिळेच्या मंदिरापासून जवळच नागझरी तीर्थ आहे या तीर्थाचें पाणी निर्मळ असून सर्वरोगपरिहारक आहे. या तीर्थाची कथा येथें सांगतात ती अशी : अहिरावणानें वासुकीचें राज्य घेतलें;

तेव्हां सर्पराज वासुकीनें तपश्चर्या करून याच ठिकाणी शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकराच्या कृपेनें रामाकडून वासुकीला राज्य परत मिळालें. या तीर्थामधून एक झरा वाहत असे. भगवान् शंकरानें नागावर कृपा केली म्हणून या झऱ्याला तीर्थत्व प्राप्त झालें, म्हणून लोक याला नागझरा किंवा नागझरी तीर्थ म्हणूं लागले.

याच नागझरी तीर्थासंबंधीं आणखी एक कथा रूढ आहे ती अशी :

फार पूर्वी बिल्वराज नांवाचा एक प्रसिद्ध राजा मोठ्या सुखांत राज्य करीत होता. या राजाला शिकारीचें मोठें जबर व्यसन होतें. त्याकरितां मग तो वेळ, अवेळ, तहान, भूक, कांहीं पहात नसे. एके दिवशीं सायंकाळीं या राजाला शिकारीची लहर लागली आणि राणी नको नको म्हणत असतांहि धनुष्य-बाण सज्ज करून राजानें आपला घोडा जंगलाच्या दिशेनें भरधांव सोडला. शिकाऱ्याची चाहूल लागतांच हरणांचे कळपच्या कळप इतस्ततः चौखूर दौडूं लागले. इतक्यांत एका वृक्षाच्या आडोशाला एक भला मोठा काळवीट आणि एक हरणी यांची जोडी राजानें हेरली. राजाच्या धनुष्यांतून बाण सुटला तो काळवीटाच्या हृदयांतून आरपार गेला. एका निमिषार्धांत काळवीट धरणीवर कोसळला पण पडतां पडतां मानवी वाणीनें तो राजाला म्हणाला, "राजा, ज्याअर्थी आम्हां निरपराध पशूंना तूं एकांतवासाचें सौख्य मिळूं दिलें नाहींस त्याअर्थी रोज रात्रीं तुझ्या अंगांत हजारों कृमीकीटक वळवळत राहतील."

राजा भयभीत झाला, तसाच घरीं परतला. रात्रीं झोंप लागतांच काळवीटाच्या शापानुसार राजाच्या अंगभर किडे वळवळूं लागले. राजाची राणी मोठी पतिव्रता होती. सारी हकीगत समजल्यावर ती दुःखी झाली. परंतु तशाहि स्थितींत तिनें राजाची सेवा सोडली नाहीं. दिवसा राजाचें शरीर नेहमीप्रमाणेंच तेजस्वी असे, एवढें त्यांतल्या त्यांत सुख होतें. कांहीं दिवसांनंतर राजा पुन्हां आपल्या सेवकांसह शिकारीसाठीं जंगलांत शिरला. दुपारची वेळ, तहानेनें

घसा कोरडा पडला म्हणून राजानें सेवकाला पाणी आणण्याची आज्ञा केली. सेवकानें अनेक ठिकाणीं शोध करून अखेर एका दुर्गम ठिकाणीं वाहणाऱ्या लहानशा झऱ्याचें तांब्याभर पाणी आणून राजाला दिलें. त्या पाण्यानें राजानें आपले हातपाय तोंड धुतले आणि राहिलेले पाणी तो प्याला.

त्या रात्रीं राणीनें असा चमत्कार पाहिला कीं, राजाचें तोंड, हात आणि पाय या भागांवर एकहि कृमि नव्हता. राणी आश्चर्यचकित झाली. तिनें बारकाईनें शोध घेतला. दुसऱ्या दिवशीं परत त्याच झऱ्यावर जाऊन तिनें आणि राजानें त्या पाण्यानें स्नान केलें. त्यावेळीं आकाशवाणी झाली कीं, "हें शेषानें निर्माण केलेलें नागझरी तीर्थ आहे. हे राजा या ठिकाणीं तूं नागेश्वराची स्थापना कर !" त्याप्रमाणें राजानें या नागझरी तीर्थावर एक मोठें प्रशस्त कुंड बांधलें. शेजारीच महादेवाची स्थापना केली. या तीर्थाचें पाणी आजहि अनेक व्याधींनीं त्रस्त झालेल्या जीवांना रोगमुक्त करतें, असें म्हणतात.

नित्य-नैमित्तिक उपासना आणि उत्सव :

येथें भोगोपचार करण्यासाठीं वेगळी उत्सवमूर्ति नाही. त्यामुळें शयन, पालखींतील मिरवणूक इत्यादींसाठीं मुख्य मूर्तीच हलवितात. वर्षांतून तीन वेळा येथें देवीची निद्रा असते. ही निद्रा केवळ चार प्रहरांच्या रात्रीपुरती नसते, तर चांगली पांच ते आठ दिवसांची असते. भाद्रपद वद्य अष्टमी ते अमावास्या हा पहिला निद्राकालः आश्विन शुद्ध एकादशी ते पौर्णिमा हा दुसरा निद्राकाल; आणि पौष शुद्ध प्रतिपदा ते अष्टमी हा तिसरा निद्राकाल. या तीन निद्राकालांशिवाय इतर सर्व काळीं ती अहोरात्र जागृत राहून भक्तभाविकांचीं दुःखें निवारीत असते.

दररोज प्रत्येक पूजेच्या वेळीं देवीच्या वस्त्रालंकारांचा वेगळा थाट असतो. गंधलेपनाचे विविध प्रकार असतात. गुढीपाडवा, शिराळषष्ठी, ललितापंचमी, बलिप्रतिपदा, मकर संक्रांत आणि रथसप्तमी



अलकारविभूषित श्रीभवानी

या दिवशी अलंकार-महापूजा करतात. त्या वेळाचा थाट अवर्णनीय असतो. देवीच्या अलंकारांत रत्नजडित टोप, हिऱ्याचा कमरपट्टा, रत्नांचे आणि मोत्यांचे हार, पुतळ्यांच्या माळा, जवमाळा, चिंचपेट्या, वाघनखांचे ताईत, गळसऱ्या, ठुशा, चंद्रहार, बाजूबंद, केकतकेवडे, राखड्या, गोंडे, वेळवाळ्या, हिऱ्यांचीं विविध कर्णभूषणें, गोठ, पाटल्या, तोडे, तोरड्या, पंजण वगैरे नानाप्रकारचे मौल्यवान् अलंकार आहेत. महाराष्ट्र दरिद्री असला तरी त्यानें आपल्या या कुलदेवतेला अमोल अलंकारांनीं नटवलें आहे. या अलंकारांच्या संभारांत शिवछत्रपति, शाहू छत्रपति, पेशवे आणि अनेक मराठे सरदार यांनीं अर्पण केलेले दागिने आहेत.

भवानी आणि तिचा देवता-परिवार यांच्यासाठीं तुळजापुरीं अनेक उत्सव-महोत्सव वर्षभर चालतात. परंतु भवानी नवरात्रोत्सवाचें महत्त्व सर्वांत अधिक आहे. भाद्रपद वद्य अष्टमीच्या संध्याकाळीं देवी सिंहासनावरून उठून पलंगावर शयन करते. आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या पहांटे पांच वाजतां उठून पुनः सिंहासनावर बसते. देवी घटीं बसली कीं, नवरात्र-उत्सव सुरू होतो. तेथून नऊ दिवस दररोज

नित्य महापूजा थाटानें होते. प्रत्येक रात्रीं वाहन बदलून देवीचा छबिना मिरवितात.

छबिन्याच्यावेळीं देवीची मूर्ति सिंह, हंस, मयूर, नंदी, गरुड यापैकीं कोणत्या तरी लाकडी वाहनावर बसवितात याचा अर्थ असा कीं ब्रह्मदेव, सरस्वती, शंकर, विष्णु हीं सारीं रूपें जगदंबेचींच आहेत.

आश्विन शुद्ध अष्टमी-नवमीला मोठा होम होतो. या दिवशीं बळीचा कार्यक्रम होतो. रात्रीं पलंग-पालखीची भव्य मिरवणूक असते. नगर भिंगार येथील तेली समाजाची ही पालखी आणि पलंग असतो. ही पालखी दसऱ्याच्या दिवशीं पहांटेच देवीपुढें येते. तेथें नगरचा मानकरी तेली भक्त आपली करंगळी कापून देवीला रक्ताचा टिळा लावतो आणि प्रार्थना करतो कीं, "आई, शिलंगणाला ऊठ, उशीर झाला." देवी पालखींत बसून सीमोल्लंघनास जाते तेव्हां देवळाच्या प्रांगणांत व भिंतीवर गर्दींच गर्दी उसळलेली असते. सर्व जागा कुंकवानें लाल होऊन जाते. प्रदक्षिणा-मार्गानें पालखी मिरवत मिरवत येऊन पिंपळाच्या शिलंगण पारावर देवी विश्रांति घेते. तेथें लोक देवीला सोनें वाहतात.

सीमोल्लंघनाहून आल्यावर सभामंडपांतील स्फटिकसिंहाजवळ भिंगार येथून आलेल्या पलंगावर देवी शयन करते. ती श्रमनिद्रा आश्विन शुद्ध चतुर्दशीपर्यंत चालू असते. या काळांत पूजादि कार्यक्रम बंद असतात. कोजागिरीस देवी पुनः जागृत होते आणि नित्या-प्रमाणें कार्यक्रम सुरू होतात. या नवरात्रांत सप्तधान्यें, सप्तमृत्तिका, अष्टगंध, अष्टधातु, नवा घट, नवीं वस्त्रं, नऊपदरी सुताची दोन फूट लांब वात, पंचपल्लव, पंचामृत इत्यादि साहित्य लागतें.

रोज पूजाअर्चा करून नवी माळ घटावर चढवितात. देवीला पुऱ्या-करंज्यांचा फुलवरा वाहतात. नवदुर्गांची पूजा करून नऊ कुमारींना भोजन घालतात. कोणी सत्यनारायणाप्रमाणें 'सत्य-अंबा' नांवाचें व्रत करतात.

वागीश्वरांची वंदना :

महाराष्ट्रांतील भक्ति आणि शक्ति एकवटून जिच्या चरणीं विसांवल्या, अशी ही अखिल महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. हिनें मराठ्यांच्या समशेरींना न्याय-नीतिचें पाणी दिलें आणि मराठी राजनीतीला धर्माची बैठक निर्माण केली. संत, पंत आणि तन्त या वागीश्वरांच्या तिन्हीं श्रेणी तिच्या सभामंडपांत वाङ्मय वंदनेला उभ्या होत्या. परचक्रांच्या पाशांत अडकलेल्या मराठी जनतेला मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठीं प्रथम एकनाथांनीं या मायभवानीचें द्वार ठोठावून :

"दार उघड बया,
आता दार उघड बया !"

असें उत्कट आवाहन केलें. आपल्या आकांक्षापूर्तीसाठीं तिची कृपा संपादन करावी, म्हणून नाथ तिच्या द्वारीं गोंधळी बनून तिला वाहत होते, भुत्या बनून पोत पाजळीत होते. शिवप्रभूंची गौरवगाथा गीर्वाणवाणींत गाणारा कवींद्र परमानंद भवानीच्या रूप-वर्णनांत तन्मय झाला होता. मुक्तेश्वरानें तर तिला 'म्लेंच्छमहिषासुरमर्दिनी' म्हणून संबोधलें आहे. महाकवि मोरोपंत यांनीं अकरा आर्यांनीं भवानीची स्तुति गायली आहे. भवानीचें भक्तवात्सल्य वर्णितांना ते म्हणतात :

तू योग्या शुभमतिदा गतिदा अतिदा सवत्सला गाया ।
सकोचावा न तुझ्या कासेला भक्तवत्स लागाया ।।

प्रसिद्ध कवि श्रीधर यांनीं आपल्या श्रीरामविजय ग्रंथांत रामवरदायिनीची कथा विस्तारानें वर्णन केली आहे. पार्वतीनें सीतेचें रूप घेतलें, याचें वर्णन करितांना ते लिहितात :

मग जनकजेचें रूप धरोनी । रामा सन्मुख आली काननीं ।।
कांचनवर्णी सुहास्यवदनी । पद्मनयनी सुरेख ।। १ ।।
बोलतां झळकति दंतपक्ती । तेज तळपतसे क्षितीं ।।
अन्नपूर्णा ते आदिशक्ति । अतर्क्य गती तियेची ।। २ ।।

अगींचा सुगंध अपार । त्या सुवासें तृप्त कांतार ।।
सुगंधासी वेधोनी समग्र । षट्पदचक्रें धावती ।। ३ ।।
विद्युन्प्राय पीतवसन । सर्वालंकार मंडित पूर्ण ।।
राघवें तें दृष्टीं देखोन । मुख मुरडोनि चालिला ।। ४ ।।

या कथानकाचा शेवट करतांना श्रीधरकवि लिहितात :

असो अंबिकेचें पूजन । स्वयें करी रघुकुळभूषण ।।
मग देवीनें वरदान । रघुवरा दीधलें ।।
म्हणे राजीवाक्षा रघुनंदना । तूं सत्वर वधिशील दशानना ।।
जानकी घेऊनि निजसदना । आयोध्येसी जाशील ।।
अहो तेचि हे रामवरदायिनी । अंबा तुळजाभवानी ।।
रघुनाथ पुढें चालला तेथोनि । दक्षिणपथें शोधित ।

कल्पनांचीं कारंजीं उडविणारा पेशवाईतील प्रतिभासंपन्न शाहीर रामजोशी आपल्या रुणझुणत्या वाणीनें भवानीचें वर्णन करतांना म्हणतो :

भूतळात जशि या स्थळात यमुनाचळात हिमनगबाळा ।
अशि भुवनत्रयी कोण ती दुजी वेल्हाळा ।।
मनसुमन करुनि विषवमन गणुनि रतिरमण शिवाची राणी ।
ही भजतां देते नित्य सुखाची खाणी ।।
हिचे चरण धरुनि दृढ शरण तया भवतरण अशी शर्वाणी ।
पावते जनां दीनासि पहा निर्वाणीं ।।

मराठी वागीश्वरांच्या या सुरांत सूर मिळवून आपणहि भवानीचा जयजयकार करूं आणि नव्या महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठीं तिच्या चरणांची कांस धरूं. कारण :

बोलतां भवानीमाता महींद्र दास्य इच्छिती ।
बोलणें हें प्रचीतीचे, अन्यथा वाउगें नव्हे ।।

* * *

देवीची आरती

दुर्गे ! दुर्घट भारी तुजविण संसारी ॥
अनाथनाथे अंबे ! करुणा विस्तारी ॥
वारीं वारीं जन्ममरणातें वारी ॥
हारी पडलों आतां संकट नीवारी ॥
जयदेवी जयदेवी महिषासुरमथनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ जय० ॥ १ ॥

त्रिभुवनभवनीं पाहतां तुज ऐसी नाहीं ॥
चारी श्रमले परंतु न बोलवे काही ॥
साही विवादतां पडले प्रवाहीं ॥
ते तू भक्तालागीं पावसी लवलाहीं ॥ जय० ॥ २ ॥

प्रसन्नवदने ! प्रसन्न होसी निजदासा ॥
क्लेशापासुनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे ! तुजवांचून कोण पुरविल आशा ॥
नरहरि तल्लिन झाला पद-पंकजकोशा ॥ जय० ॥३॥

तुळजाभवानीची आरती :

सुरवरवरदायिनी सुरहर सुखसदना ॥
परतर परवासिनि अरिकुळरिपुकदना ॥
व्यापक सर्वां घटीं जननी हे मरदाना ॥
करुणासागररूपे जागर शशिवदना ॥
जयदेवी जयदेवी जय विश्वभरिते ।
आरती ओवाळू तुळजे गुणसरिते ॥ जय देवी ॥ १ ॥

सकळां संजीविनी मुनिजनमनमोहिनी ॥
जनमनविज्जन सज्जनमज्जन तपशमनी ॥
दासा अभ्यंतरीं मानसमृगशयनी ॥
राघववरदा सुंदर लाघव मृगनयनी ॥
जयदेवी जयदेवी जय विश्वभरिते ।
आरती ओवाळू तुळजे गुणसरिते ॥ जय देवी० ॥ २ ॥

* * *

# श्रीसमर्थांचें शक्ति-स्तोत्र

शिवप्रभूंच्या स्वराज्य-सिद्धीच्या सर्व प्रयत्नांमागें श्रीसमर्थ रामदासांनीं आपल्या तपोबलाचें अधिष्ठान उभें केलें होतें. समर्थांना शिवप्रभूंच्या करवीं महाराष्ट्रांत 'आनंदवनभुवन' निर्माण करण्याची तळमळ लागली होती. त्यासाठीं त्यांनीं आपल्या सर्व आत्मिक शक्तींचा विनियोग केला. या आत्मिक शक्तींच्या उपासनेचें प्रतीक म्हणून त्यांनीं तुळजापूरच्या श्रीभवानीचीं अनेक स्तोत्रें गाइलीं आहेत. त्यांतील एक स्तोत्र पुढें दिलें आहे; त्यांत देवीचें वात्सल्य आणि सामर्थ्य वर्णिलें आहे.

बाळका वाढवी माता । जेथें तेथें परोपरी ।
स्वभावें जीवीचें जाणें । अतरीं विवरे सदा ॥ १ ॥
बाळका बोलता येना । हीत तेंहि कळेचिना ।
हेंकाड बावळें वेडें । मातेला प्रिय होतसे ॥ २ ॥
अन्यायी अवगुणी खोडी । कुश्चीळ रडते सदा ।
असतें माय लोभाळू । लोभें गुणासी वाढवी ॥ ३ ॥
नागिवें उघडें लोळे । हागे वोकी आव्हासव्हा ।
तैशास नेटकें दावी । लेववी नेसवी सदा ॥ ४ ॥
मातेचा कळवळा मोठा । लोभासी तुळणा नसे ।
आळसेना विसबेना । कटाळेना कदापिही ॥ ५ ॥
त्रैलोक्य बाळका पाळी । वाढवी शाहाणें करी ।
कुळेंची पाळिलीं कीती । कुळदेव्या म्हणोनियां ॥ ६ ॥
त्रीलोकीं पुरली आहे । त्रैलोक्यजननी पाहा ।
तेची हे तुळजामाता । भक्तांतें पाळिते सदा ॥ ७ ॥
वोळखा सांडिली बाळें । तीला तों सांडितां नये ।
लोभेंची पाळणें लागे । नानादेहीं भरोनियां ॥ ८ ॥
मात्रकुळ पित्रकुळ । सर्वांसी पाळिते सदा ।
आद्यंत ठाउकें आहे । कुळमूळाग्र सर्व हीं ॥ ९ ॥

उपजली वाढली कोठें । हिंडली फिरली किती ।
भाग्याचे करटे जाले । मूर्ख विपन्न सर्वही ॥ १० ॥
विधाची साक्षणी माता । विश्वमाता म्हणोनियां ।
श्रीमत करटे तीनें । रक्षिले पाळिले किती ॥ ११ ॥
तीचा लो लागला आहे । त्रैलोक्य सकळै जना ।
तीवीण विषयो कैचा । जगजोती चहुंकडे ॥ १२ ॥
जीणें ती लागलें आहे । ज्ञाते हो समजा बरें ।
शक्तीनें चालतो देहो । शक्ती नस्तां देहे पडे ॥ १३ ॥
शक्ती ते सर्व शक्ती ते । आदीशक्ती पुरातना ।
दासासी पाळते लीळा । ध्यानमूर्ति ठसावली ॥ १४ ॥

* * *

REFBK-0017201

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५५८८... वि ...
ग्रंथांक ५०८ ... नों. दि. 3-3-1967

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96207
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)